आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१ ऑगस्ट २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

- संसदेत विविध मुद्द्यांवरून आजही गदारोळ, लोकसभेचं कामकाज २ वाजेपर्यंत तर राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या विसाव्या हप्त्याचं उद्या प्रधानमंत्र्यांच्या हस्ते वितरण

- सुधारित बँकिंग कायदे तसंच युपीआय पेमेंट ॲपच्या वापरासंबंधीच्या नव्या नियमांची अंमलबजावणी आजपासून

**आणि**

- व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडरच्या दरात साडे तेहतीस रुपये घट

**<><><><>**

नव्या उपराष्ट्रपतींची निवड करण्यासाठी भारत निवडणूक आयोगानं आज निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. येत्या ७ ऑगस्टला निवडणुकीसाठीची अधिसूचना जारी होईल. २१ ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत राहील तर ९ सप्टेंबरला मतदान होणार असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झालं आहे. आयोगानं या निवडणुकीसाठी मतदार संघातल्या सदस्यांची यादी अद्ययावत केली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य उपराष्ट्रपती निवडतात.

**<><><><>**

विविध मुद्द्यांवर गदारोळ झाल्यानं लोकसभेचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित करण्यात आलं आहे. ११ वाजता कामकाज सुरु झाल्यावर सभापती ओम बिरला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला, त्याचवेळी विरोधी पक्षांनी बिहारमधलं मतदारयाद्या पुनरिक्षण रद्द करावं या मागणीसाठी घोषणा द्यायला सुरुवात केली. प्रश्नोत्तराच्या तासाचं कामकाज आणि इतर महत्त्वाचं कामकाज चालू द्यावं असं आवाहन सभापतींनी केलं मात्र त्याचा उपयोग झाला नाही. सभापतींनी कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब केलं.

राज्यसभेतही विरोधकांनी विविध मुद्द्यांवर घोषणाबाजी केली. आपल्याकडे ३० स्थगन प्रस्ताव आले असून ते फेटाळत असल्याचं उपाध्यक्ष हरिवंश यांनी सांगितलं. बिहारमधल्या मतदार याद्या पुनरिक्षणावर चर्चा घेता येणार नाही, कारण निवडणूक आयोग संवैधानिक संस्था आहे, आणि हा प्रश्न न्यायप्रविष्ट आहे; असं हरिवंश यांनी स्पष्ट केलं. मात्र विरोधकांच्या घोषणा चालूच राहील्यानं कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित केलं. त्यानंतरही गदारोळ कायम राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं. आता सभागृह येत्या सोमवारी भरेल.

**<><><><>**

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या विसाव्या हप्त्याचं वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या होणार आहे. प्रधानमंत्री उद्या उत्तर प्रदेशात वाराणसीच्या दौऱ्यावर असतील. यावेळी प्रधानमंत्री किसान सन्मान योजने अंतर्गत नऊ कोटी ७० लाख शेतकऱ्यांना २० हजार ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम वितरित केली जाईल. उत्तर प्रदेशातल्या २००० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनही मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><>**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. लोकमान्य टिळक ट्रस्टचा राष्ट्रीय पुरस्कार आज पुण्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना प्रदान करण्यात येणार आहे.

केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी लोकमान्य टिळकांना आदरांजली वाहिली आहे. लोकमान्यांनी केलेल्या जनजागृतीच्या कार्याचा गौरव त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे केला आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही लोकमान्य टिळकांना आदराजंली वाहिली आहे.

**<><><><>**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर इथं अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला

पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. अण्णाभाऊ साठे यांनी दाखवलेल्या वंचितांच्या विकासाच्या मार्गावर राज्य शासन चालेल, असं ते यावेळी म्हणाले.

<><><><>

बँकिंग क्षेत्रात प्रशासकीय सुधारणांसाठी तसंच ठेवीदार आणि गुंतवणूकदारांना अधिकाधिक संरक्षण देण्याच्या उद्देशानं बँकिंग कायदा सुधारणा अधिनियम २०२५ आजपासून लागू होत आहे. हा कायदा यावर्षी १५ एप्रिलला अधिसूचित करण्यात आला होता. सार्वजनिक क्षेत्रांतल्या बँकांमध्ये लेखापरीक्षणाची गुणवत्ता वाढवणं आणि सहकारी बँकांमधे अध्यक्ष आणि पूर्णवेळ संचालकांव्यतिरिक्त इतर संचालकांच्या कार्यकाळात वाढ करण्याची तरतूद यात आहे, असं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><>

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियानं युपीआय पेमेंट ॲपच्या वापरासंबंधी जारी केलेले नवे नियम आजपासून अमलात आले. सर्व्हरवरचा ताण कमी करून ऑनलाइन पेमेंटची कार्यक्षमता वाढण्याच्या उद्देशानं हे नवे नियम लागू केले आहेत.

या नव्या नियमांनुसार आता ग्राहकांना अशा ॲपवरून दिवसभरात आपल्या बँक खात्यातली शिल्लक ५० वेळाच तपासता येईल. यावर आणखी मर्यादा घालण्याचा अधिकार युपीआय पेमेंट ॲप्सला असणार आहे.

याशिवाय आता ऑटो पेमेंटचे व्यवहार आता सकाळी १० वाजण्या पूर्वी, दुपारी १ ते ५ आणि रात्री साडेनऊ नंतर केले जाणार आहेत. याशिवाय जर व्यवहारात अडचण आली तर आता त्या व्यवहाराची प्रत्यक्ष स्थिती ग्राहकांना समजून घेता येणार आहे. स्थिती तपासण्यासाठी ग्राहकांना ३ संधी मिळतील, त्यासाठी प्रत्येकी ९० सेकंदांचा प्रतीक्षा कालावधी असेल.

<><><><>

भारतासह अनेक राष्ट्रांवर अतिरिक्त आयात कर लागू करण्याच्या आदेशावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल स्वाक्षरी केली. येत्या ७ ऑगस्टपासून ४१ टक्के इतका आयात कर लागू असेल. हा कर यापूर्वी आजपासून लागू होणार होता, मात्र यंत्रणा अद्ययावत करण्यासाठी वेळ मिळावा म्हणून त्याची अंमलबजावणी पुढे ढकलण्यात आली आहे. व्यापारी तूट आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या जोखिमेत संतुलन साधण्यासाठी हे

अतिरिक्त कर लागू केल्याचं ट्रम्प यांचं म्हणणं आहे. अमेरिकेने सीरियावर ४१ टक्के, लाओस आणि म्यानमावर ४० टक्के, स्वित्झर्लंडवर ३९ टक्के, इराक, सर्बिया आणि कॅनडावर ३५ टक्के इतके कर आकारले आहेत. भारतावर २५ टक्के तर पाकिस्तानवर १९ टक्के कर आकारला जात आहे.

<><><><>

व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडरच्या दरात साडे तेहतीस रुपयांची घसरण झाल्याची घोषणा तेल विपणन कंपन्यांनी आज केली. त्यानुसार नवी दिल्लीत १९ किलो वजनाच्या सिलेंडरची किंमत १ हजार ६३१ रुपये ५० पैसे असेल. मुंबईत या सिलेंडरची किंमत १ हजार ५८३ रुपये असेल. उपाहार गृह आणि तयार खाद्यपदार्थांच्या दुकानांना याचा फायदा होईल.

घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरच्या किंमतीत कोणताही बदल झालेला नाही.

<><><><>

इस्त्रायलने लेबनॉनच्या पूर्व आणि दक्षिण भागांमधे हिजबुल्लाहच्या अनेक तळांवर काल हवाई हल्ले केले. इस्त्रायल संरक्षण दलांनी एका निवेदनाद्वारे ही माहिती दिली. इस्त्रायली संरक्षण मंत्री इस्त्रायल काट्झ यांनी एका वेगळ्या निवेदनात म्हटलं की, हिजबुल्लाहचं लेबनॉनमधलं सर्वात मोठं क्षेपणास्त्र उत्पादन केंद्र ही या हल्ल्यात लक्ष्य करण्यात आलं आहे.

<><><><>

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात खातेबदल झाला आहे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना आता युवा, क्रीडा आणि औकाफ खातं मिळालं असून दत्तात्रय भरणे आता कृषीमंत्री असतील. माणिकराव कोकाटे आक्षेपार्ह वक्तव्यांसह विविध कारणांसाठी वादात सापडले होते.

<><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या सामन्यात काल दिवसअखेर भारताच्या ६ गडी बाद २०४ धावा झाल्या होत्या. करूण नायरनं अर्धशतकी खेळी करत भारताचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला; आज नायर

आणि सुंदर भारताचा डाव पुढे सुरु करतील. या सामन्यात भारतानं गोलंदाज आकाशदीप आणि प्रसिद्ध कृष्णा यांना संघात स्थान दिलं आहे.

**<><><><>**

मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. पुरूष एकेरीत तरुण मन्नेपल्ली आणि लक्ष्य सेन यांनी आपापले सामने जिंकून अंतिम आठामध्ये प्रवेश निश्चित केला. या दोघांचे सामने आज चीनच्या खेळाडूंबरोबर होणार आहेत. पुरूष दुहेरीत, सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी जपानच्या जोडीचा १०-२१, २२-२०, २१-१६ असा पराभव केला. आज उपांत्यपूर्व फेरीत त्यांची गाठ मलेशियन जोडीशी पडणार आहे. आयुष शेट्टीचा पराभव झाल्याने तो स्पर्धेबाहेर पडला.

**<><><><>**

रक्षाबंधन, गोकुळाष्टमी तसंच वेलंकनी यात्रेसाठी प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन पश्चिम रेल्वे विशेष रेल्वे गाड्या सोडणार आहे.

**<><><><>**

जम्मूमधून निघणारी अमरनाथ यात्रा प्रतिकूल हवामानामुळे आज सलग दुसऱ्या दिवशीही स्थगित झाली.

**<><><><>**

बिहार, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, हिमाचल प्रदेश, झारखंड आणि सिक्कीममध्ये आज अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**//<><><><>//**